# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेत प्रकल्प विभागांतर्गत विविध विकास
**{ सा. प्र. वि }** कामे / प्रकल्प राबविण्यात येत आहेत. सदर प्रकल्पासंबंधातील अनुषंगीक कार्यवाही करणे, प्रकल्प विहीत वेळेत पूर्ण करणे, इत्यादी आवश्यक कामास्तव जाहिरात क्र. ९०१/पी.आर., दि. १८/०१/२०२४ च्या अनुषंगाने व गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेऊन निवड करण्यात आलेल्या खालील सेवानिवृत्त उमेदवारांना करार / कंत्राट पद्धतीवर शासन निर्णय दि. १७ डिसेंबर २०१६ मधील व शासन निर्णय ८ सप्टेंबर २०२३ मध्ये झालेल्या दुरूस्त तरतुदीनुसार, करार पद्धतीने प्रथमत: ६ महिन्याकरीता कार्यालयीन आदेश क्र. २७२/ओ.ॲन्ड.एम., दि. ०५/०३/२०२४ अन्वये चार "कंत्राटी सेवानिवृत्त उपअभियंता (स्थापत्य)" म्हणून नियुक्ती करण्यात आलेले होते. त्यानंतर मनपा प्रशासक ठराव क्र. १२४६, दि.११/०२/२०२५ नुसार दिलेल्या मंजुरीनुसार कार्यालयीन आदेश क्र. २७२/ओ.ॲन्ड.एम., दि. ०१/०७/२०२५ अन्वये त्यांचा नियुक्ती कालावधी दि. ०६/०९/२०२५ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे तीन "कंत्राटी सेवानिवृत्त उपअभियंता (स्थापत्य)" यांच्या सेवेची प्रकल्प विभागाला आवश्यकता असल्यामुळे, तांत्रिक खंड देऊन दि. ०९/०९/२०२५ पासून पुढील ६ महिन्याकरीता (दि. ०८/०३/२०२६) पर्यंत मुदतवाढ देण्याचा व याकरिता अंदाजे रु.१४,५३,५००/- इतका खर्च येणार असुन, प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी.

**टिप :-** सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत उपलब्ध आहेत.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 283/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 16/09/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन विभागयांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेत प्रकल्प विभागांतर्गत विविध विकास कामे/प्रकल्प राबविण्यात येत आहेत. सदर प्रकल्पासंबंधातील अनुषंगीक कार्यवाही करणे, प्रकल्प विहीत वेळेत पूर्ण करणे, इत्यादी आवश्यक कामास्तव जाहिरात क्र. ९०१/पी.आर., दि. १८/०१/२०२४ च्या अनुषंगाने व गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेऊन निवड करण्यात आलेल्या खालील सेवानिवृत्त उमेदवारांना करार / कंत्राट पद्धतीवर शासन निर्णय दि. १७ डिसेंबर २०१६ मधील व शासन निर्णय ८ सप्टेंबर २०२३ मध्ये झालेल्या दुरूस्त तरतुदीनुसार, करार पद्धतीने प्रथमत: ६ महिन्याकरीता कार्यालयीन आदेश क्र. २७२/ओ.ॲन्ड.एम. ,दि. ०५/०३/२०२४ अन्वये चार "कंत्राटी सेवानिवृत्त उपअभियंता (स्थापत्य)" म्हणून नियुक्ती करण्यात आलेले होते. त्यानंतर मनपा प्रशासक ठराव क्र. १२४६, दि.११/०२/२०२५ नुसार दिलेल्या

मंजुरीनुसार कार्यालयीन आदेश क्र. २७२/ओ.अॅन्ड.एम., दि. ०१/०७/२०२५ अन्वये त्यांचा नियुक्ती कालावधी दि. ०६/०९/२०२५ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे तीन "कंत्राटी सेवानिवृत्त उपअभियंता (स्थापत्य)" यांच्या सेवेची प्रकल्प विभागाला आवश्यकता असल्यामुळे, तांत्रिक खंड देऊन दि.०९/०९/२०२५ पासून पुढील ६ महिन्याकरीता (दि. ०८/०३/२०२६) पर्यंत मुदतवाढ देण्याचा व याकरिता अंदाजे रु.१४,५३,५००/- इतका खर्चाच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.